महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३

# सन १९५६ चा मुंबईचा शहर रचना योजना [ मुंबई शहर क्रमांक २, ३ व ४ (माहीम विभाग) ] कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम

(दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. III of 1957.**

# THE BOMBAY TOWN PLANNING SCHEMES [ BOMBAY CITY Nos. II, III AND IV (MAHIM AREA) VALIDATION ] ACT, 1956

*( As modified upto the 26th January 2015 )*

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५

[ किंमत : १४ रुपये ]

## सन १९५६ चा मुंबईचा शहर रचना योजना [ मुंबई शहर क्रमांक २, ३ व ४ (माहीम विभाग) ] कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम.

### अनुक्रमणिका

**प्रस्तावना.** **पृष्ठ**

**कलमे.**


| | | |
|---|---|---|
| १. | लघु संज्ञा व व्याप्ती. | ... २ |
| २. | व्याख्या. | ... २ |
| ३. | सन १९१५ चा मुंबईचा अधिनियम १ ला याच्या १ ल्या कलमाची सुधारणा. | ... २ |
| ४. | जाहीरनामे, अर्ज, मंजुरी, निवाडे वगैरे कायदेशीर ठरविणे. | ... ३ |
| ५. | शहर रचना योजनेच्या संबंधातील जाहीरनामे वगैरेंच्या कायदेशीरपणास हरकत न घेणे आणि दावे व कामकाज यांना मनाई. | ... ३ |
| ६. | अनिर्णीत दावे व कामकाज यांस अधिनियम लागू करणे. | ... ४ |

# सन १९५७ चा मुंबई अधिनियम ३ रा

## सन १९५६ चा मुंबईचा शहर रचना योजना [ मुंबई शहर क्रमांक २, ३ व ४ (माहीम विभाग) ] कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम

[ राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर **मुंबई राजपत्रात** तारीख १८ माहे जानेवारी सन १९५७ रोजी (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

### मुंबई शहरांतील विवक्षित शहर रचना योजनांच्या बाबतीत चालविलेल्या विवक्षित कामांसंबंधींच्या शंका दूर करणे व त्यांचा कायदेशीरपणा प्रस्थापित करणे याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** सन १९१५ चा मुंबईचा शहर रचनेबाबत अधिनियम (ज्यास यात " मुख्य अधिनियम " असे म्हटले आहे) याचे कलम १, पोट-कलमे (२) व (३) ही प्रथम मुंबई शहरास लागू करण्यात आली नव्हती, परंतु, त्यात, प्रांतिक सरकारला (ज्यास या प्रस्तावनेत " सरकार " असे म्हटले आहे) मुंबई शहराच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनने (जीस यात " कॉर्पोरेशन " असे म्हटले आहे) केलेल्या लेखी अर्जावरून अशा अर्जास सबंध कॉर्पोरेशनच्या बहुसंख्य सदस्यांची संमति मिळाली असेल तर, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून मुख्य अधिनियमाचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे ठराव मुंबई शहरास लागू करण्याचा अधिकार आहे अशी तरतूद केली होती ;

सन १९१५ चा मुंबई १.

(२) आणि **ज्याअर्थी,** मुख्य अधिनियमाच्या सदरहू ठरावांनुसार कॉर्पोरेशनच्या बहुसंख्य सदस्यांची संमति मिळालेल्या कॉर्पोरेशनच्या अर्जावरून सरकारने, तारीख २८ माहे जानेवारी सन १९१९ रोजीची आपली अधिसूचना क्रमांक ७०९ हीवरून मुख्य अधिनियम मुंबई शहरास सर्वस्वी लागू केला ;

(३) आणि **ज्याअर्थी,** सन १९३८ चा मुंबईचा शहररचनेबाबत अधिनियम सुधारण्याबाबत अधिनियम (ज्यास या प्रस्तावनेत " सुधारणा अधिनियम " असे म्हटले आहे) यावरून मुख्य अधिनियमाचे कलम १, पोट-कलमे (२) व (३) ही रद्द करण्यात आली व पुन्हा अधिनियमित करण्यात आली; परंतु त्यात, मुख्य अधिनियम प्रथम मुंबई शहरास लागू असणार नाही, परंतु कॉर्पोरेशनच्या कौन्सिलरांच्या एकूण संख्येपैकी निम्म्याहून अधिक कौन्सिलरांची संमति मिळालेल्या कॉर्पोरेशनच्या लेखी अर्जावरून **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून मुख्य अधिनियम सदरहू शहरास लागू करण्याचा सरकारला अधिकार आहे अशी पुन्हा तरतूद केली होती ;

सन १९३८ चा मुंबई २१.

(४) आणि **ज्याअर्थी,** वरील परिच्छेद (२) मध्ये उल्लेख केलेल्या उपरिनिर्दिष्ट अधिसूचनेच्या आधारे कॉर्पोरेशनने मुंबई शहरात, शहर रचना योजना क्रमांक २, ३ व ४ (माहीम विभाग) तयार करण्याचे काम सुरू केले आहे ;

(५) आणि **ज्याअर्थी,** सदरहू योजना तयार करण्याच्या कारणाकरिता सदरहू कामकाजात सरकारने, सदरहू योजना तयार करण्यास मंजुरी दिली होती, नुकसान होणाऱ्या मालकांचा सल्ला घेतला होता, लवाद व लवादींचे न्यायाधिकरण नेमण्यात आले होते, योजनांचे मसुदे मंजूर केले होते, तक्रारींचा निर्णय करण्यासाठी चौकशी करण्यात आली होती ; कॉर्पोरेशनने खर्च केला होता व इतर कित्येक गोष्टी केल्या होत्या ;

(६) आणि **ज्याअर्थी,** आता, सुधारणा अधिनियम संमत झाल्यानंतर, सुधारणा अधिनियमावरून सुधारल्याप्रमाणेच्या मुख्य अधिनियमाचे कलम १, पोट-कलम (३) याअन्वये सरकारकडून मुख्य अधिनियमाचे ठराव सदरहू शहरास लागू करणारी नवीन अधिसूचना काढण्यात आली नव्हती या मुद्यावर वरील परिच्छेद (५) यांत उल्लेख केलेल्या कामकाजांच्या कायदेशीरपणाबाबत शंका उपस्थित केल्या आहेत ;

(७) आणि **ज्याअर्थी,** उपस्थित केलेल्या शंका दूर करण्यासाठी व कॉर्पोरेशनने, सरकारने व उपरोक्त शहररचना योजना तयार करण्याच्या व त्या पुऱ्या करण्याच्या कारणाकरिता मुख्य अधिनियमाअन्वये त्याबाबत योग्य रीतीने अधिकृत केलेल्या इतर प्राधिकारी मंडळांनी केलेले सर्व कामकाज कायदेशीर ठरविणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी, यावरून पुढे लिहिल्याप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

लघु संज्ञा व व्याप्ती. **१.** (१) या अधिनियमास, सन १९५६ चा मुंबईचा शहररचना योजना [ मुंबई शहर, क्रमांक २, ३ व ४ (माहीम विभाग) ] कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम असे म्हणावे.

(२) तो मुंबई शहरास लागू आहे.

व्याख्या. **२.** या अधिनियमात विषयास किंवा संदर्भात काही बाध येत नसेल तर—

(अ) “ मुख्य अधिनियम ” या संज्ञेचा अर्थ, वेळोवेळी सुधारल्याप्रमाणेचा सन १९१५ चा मुंबईचा शहररचनेबाबत अधिनियम, असा समजावा ; सन १९१५ चा मुंबई १.

(ब) “ सुधारणा अधिनियम ” या संज्ञेचा अर्थ, सन १९३८ चा मुंबईचा शहररचनेबाबत अधिनियम, सुधारण्याबाबत अधिनियम, असा समजावा ; सन १९३८ चा मुंबई २१.

(क) “ मुंबई शहर ” या संज्ञेचा अर्थ, सन १९४५ चा बृहन्मुंबईच्या कायद्यांबाबत व मुंबई उच्च न्यायालयाच्या या हद्दी ठरविण्याबाबत अधिनियम यास जोडलेल्या अनुसूची “ अ ” च्या पहिल्या भागात निर्दिष्ट केलेला प्रदेश, असा समजावा ; सन १९४५ चा मुंबई १७.

(ड) “ कॉर्पोरेशन ” या संज्ञेचा अर्थ, मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनबाबत अधिनियम, याअन्वये रचना केलेली बृहन्मुंबईची म्युनिसिपल कॉर्पोरेशन, असा समजावा ; सन १८८८ चा मुंबई ३.

(ई) “ योजना ” या संज्ञेचा अर्थ, शहररचना योजना, मुंबई शहर क्रमांक २, ३ व ४ (माहीम विभाग), असा समजावा ;

(फ) या अधिनियमात ज्यांची व्याख्या केलेली नाही असे शब्द व संज्ञा यांचे, मुख्य अधिनियमात त्यांना जे अर्थ दिलेले असतील तेच अर्थ असतील.

सन १९१५ चा मुंबईचा अधिनियम १ ला याच्या १ ल्या कलमाची सुधारणा. **३.** सुधारणा अधिनियम ज्या तारखेस अंमलात आला त्या तारखेपासून, मुख्य अधिनियमाच्या १ ल्या कलमांतील—

(१) पोट-कलम (२) मधील, “ मुंबई शहर खेरीज करून ”, आणि

(२) पोट-कलम (३) चा विशेष ठराव धरून पोट-कलम (३),

हे शब्द व ठराव गाळण्यात यावे व ते गाळण्यात आले आहेत असे समजले पाहिजे, आणि मुख्य अधिनियम मुंबई शहरास लागू केला आहे असे समजले पाहिजे.

**४.** मुख्य अधिनियम किंवा सुधारणा अधिनियम यात कोणताही मजकूर असला तरीही,—

जाहीरनामे, अर्ज, मंजुरी, निवाडे वगैरे कायदेशीर ठरविणे.

(१) सदरहू योजनांच्या संबंधात राज्य सरकारने, कॉर्पोरेशनने, कोणत्याही प्राधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी केलेले सर्व जाहीरनामे, अर्ज, योजनांचे मसुदे आणि प्रकाशने, सर्व कामकाज, विचारविनिमय आणि चौकशा, दिलेले सर्व दाखले आणि मंजुरी, केलेल्या सर्व कबुलायती, दिलेल्या सर्व नोटिसा, घेतलेले सर्व निर्णय, सर्व बाबतीत दिलेली संमति, केलेल्या सर्व नेमणुका, दिलेले सर्व आदेश आणि केलेले सर्व निवाडे आणि केलेली सर्व कृत्ये ही मुख्य अधिनियमाअन्वये किंवा मुख्य अधिनियम रद्द करणारा व पुन्हा अधिनियमित करणारा कोणताही कायदा धरून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये यथास्थिति, कायदेशीरपणे केले आहेत, दिले आहेत, केल्या आहेत, दिल्या आहेत, घेतले आहेत, दिल्या आहेत, केल्या आहेत, केले आहेत आणि केली आहेत असे समजले पाहिजे आणि ते तसे नेहमी केले आहे असे समजले पाहिजे ; आणि

(२) राज्य सरकारने व कॉर्पोरेशनने, तसेच मुख्य अधिनियमान्वये नेमलेल्या किंवा काम करण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने सुद्धा मुख्य अधिनियमाअन्वयेच्या किंवा मुख्य अधिनियम रद्द करणारा व पुन्हा अधिनियमित करणारा कोणताही कायदा धरून, कोणत्याही इतर कायद्याअन्वयेच्या शहररचना योजना पुऱ्या करण्याकरिता आवश्यक असेल असे कामकाज चालविणे, असे आदेश देणे, असे निवाडे करणे किंवा निर्णय घेणे आणि इतर कोणतीही कामे करणे कायदेशीर असेल.

शहररचना योजनेच्या संबंधातील जाहीरनामे वगैरेंच्या कायदेशीर-पणास हरकत न घेणे आणि दावे व कामकाज यांना मनाई.

**५.** (१) ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी सदरहू योजनांच्या संबंधात यथास्थिति, काढलेला किंवा काढण्याचे योजिलेला कोणताही जाहीरनामा, अधिसूचना अथवा केलेला किंवा करावयाचे योजिलेला कोणताही अर्ज, प्रकाशन, नेमणूक, आदेश, ठराव, किंवा चौकशी अथवा दिलेला किंवा देण्याचे योजिलेला कोणताही निवाडा, नोटीस, मंजुरी, प्रमाणपत्र किंवा मान्यता अथवा चालविलेले किंवा चालविण्याचे योजलेले कामकाज अथवा घेतलेला किंवा घ्यावयाचे योजलेला कोणताही सल्ला, केलेली किंवा करावयाचे योजलेली कोणतीही कबुलायत अथवा घेतलेला किंवा घ्यावयाचे योजलेला कोणताही निर्णय, मिटवलेली किंवा मिटविण्याचे योजिलेली तक्रार, आखलेला किंवा आखण्याचे योजिलेला योजनेचा मसुदा किंवा अखेरची योजना किंवा केलेले किंवा करावयाचे योजिलेले कृत्य, यांच्या कायदेशीरपणास हरकत घेता कामा नये.

(२) कोणत्याही न्यायालयास, कॉर्पोरेशन किंवा राज्य सरकार यांच्या विरुद्ध किंवा लवाद, अध्यक्ष, लवादीची न्यायाधिकरणे, मुख्य अधिनियमाअन्वये नेमलेले अधिकारी किंवा योजनांच्या संबंधात मुख्य अधिनियमाअन्वये काम चालविणारे किंवा काम चालविणारे म्हणून समजण्यात येणारे कॉर्पोरेशनचे किंवा राज्य सरकारचे अधिकारी यांपैकी कोणतेही लवाद, अध्यक्ष, लवादीची न्यायाधिकरणे किंवा अधिकारी यांच्या विरुद्ध, सुधारणा अधिनियमावरून सुधारल्याप्रमाणेंच्या मुख्य अधिनियमाचे कलम १ चे पोट-कलम (३) याअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे मुख्य अधिनियम मुंबई शहरास कायदेशीरपणे लागू करण्यात आला नव्हता याच केवळ मुद्द्यावर कोणताही दावा किंवा कायद्याचे कामकाज दाखल करण्याचा किंवा त्याची न्याय चौकशी करण्याचा क्षेत्राधिकार असणार नाही.

अनिर्णीत दावे व कामकाज यास अधिनियम लागू करणे.

**६.** हा अधिनियम सुरू होण्याच्या तारखेस दाव्याचे काम प्रथम चालू करणारे न्यायालय किंवा अपिलांचे न्यायालय यांपैकी कोणत्याही न्यायालयास, कोणताही दावा किंवा इतर कामकाज अनिर्णीत असले तरीही, मागील कलमाचे ठराव लागू होतील.

---

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३०६९५
  ०२२-२३६३४०४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक.
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२५८०८
  ०२०-२६१२४७५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२६१५

- **सहायक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३४३३९६
  ०२४०-२३३१४६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५०४०२

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते